महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५४ वा | दिनांक : ०६/०८/२०२५ | वार : बुधवार

# ट्रम्प यांनी औषधांवर २५०% कर लादण्याची धमकी दिली



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषध उत्पादनांवर 250% कर लादण्याची धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी सीएनबीसीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की ते सुरुवातीला औषधांवर एक छोटासा कर लादतील, परंतु नंतर तो एक ते दीड वर्षात 150% आणि नंतर 250% पर्यंत वाढवतील.

ट्रम्प म्हणाले की आम्हाला औषधे आपल्या देशातच बनवायची आहेत. त्यांचा असा विश्वास आहे की अमेरिका औषध उत्पादनांसाठी परदेशी देशांवर, विशेषतः भारत आणि चीनवर खूप अवलंबून आहे. या शुल्काचा भारतीय औषध क्षेत्रावर वाईट परिणाम होऊ शकतो.

अमेरिका भारताकडून जेनेरिक औषधे, लस आणि सक्रिय घटक खरेदी करते. 2025 मध्ये भारताची अमेरिकेला औषध निर्यात 7.5 अब्ज डॉलर्स (सुमारे 65 हजार कोटी रुपये) पेक्षा जास्त होती.

अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या मते, अमेरिकेत वापरल्या जाणाऱ्या सर्व जेनेरिक औषधांपैकी सुमारे 40% औषध भारतातून येतात.

जर ट्रम्प यांनी औषधांवरील शुल्क 250% पर्यंत वाढवले तर भारतीय कंपन्यांना अमेरिकेत त्यांच्या उत्पादनांच्या किमती दुप्पट कराव्या लागतील. यामुळे कंपन्यांच्या नफ्यात मोठी घट होईल. तोटा टाळण्यासाठी, भारतीय औषध कंपन्या अमेरिकेत उत्पादन वाढवण्याचा विचार करू शकतात.

अमेरिकेतील बहुतेक स्वस्त जेनेरिक औषधे भारत आणि चीनमधून येतात. महागड्या औषधांचा तोटा रुग्णांना सहन करावा लागेल, ज्यामुळे अमेरिकेतील लोकांच्या समस्या वाढतील.

भारतातून निर्यात होणाऱ्या औषधांमध्ये अँटीबायोटिक्स, अँटीडिप्रेसेंट्स आणि हृदयरोगाच्या औषधांचा समावेश आहे. भारत स्वस्त दरात जेनेरिक औषधे बनवतो, ज्यामुळे दरवर्षी अमेरिकन आरोग्यसेवा व्यवस्थेची अब्जावधी डॉलर्सची बचत होते.

एप्रिलच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी सांगितले होते की आम्ही लवकरच औषधांवर मोठे शुल्क लादणार आहोत. ट्रम्प म्हणाले की त्यांचे उद्दिष्ट परदेशी औषध उत्पादक कंपन्यांना अमेरिकेत परत आणणे आणि देशांतर्गत औषध उद्योगाला प्रोत्साहन देणे आहे.

ट्रम्प म्हणाले की, इतर देश औषधांच्या किमती कमी ठेवण्यासाठी खूप दबाव आणतात. या कंपन्या तिथे स्वस्तात औषधे विकतात, पण अमेरिकेत असे होत नाही. एकदा या औषध कंपन्यांवर शुल्क लादले की, या सर्व कंपन्या अमेरिकेत परत येतील.

ट्रम्प यांनी 2 एप्रिल रोजी टॅरिफची घोषणा केली. या अंतर्गत, अमेरिकेने प्रत्येक देशावर 10% बेसलाइन टॅरिफ लादला. औषध उद्योगाला या टॅरिफमधून सूट देण्यात आली. त्यानंतर, टॅरिफ 1 ऑगस्टपर्यंत 90 दिवसांसाठी पुढे ढकलण्यात आला.

त्यानंतर 30 जुलै रोजी ट्रम्प यांनी भारतावर 26% कर लागू करण्याची घोषणा केली जी 7 ऑगस्टपासून लागू होईल. औषध उत्पादनांवर किती कर लावला जाईल याची माहिती देण्यात आली नव्हती.

आतापर्यंत ट्रम्प प्रशासन भारतातून येणाऱ्या औषधांवर कोणताही कर लादत नाही.

कोरोना साथीच्या काळात, ट्रम्प यांनी 6 एप्रिल 2020 रोजी पंतप्रधान मोदींशी बोलले. त्यानंतर ट्रम्प म्हणाले, मी आज पंतप्रधान मोदींशी बोललो. ते आम्हाला मोठ्या प्रमाणात हायड्रॉक्सीक्लोरोक्विन पुरवतील. हे खूप उदार आहे. आम्ही याबद्दल खूप आभारी आहोत. आणि मला वाटते की हे गेम चेंजर ठरेल.

तथापि, त्यांनी नंतर सांगितले की जर काही कारणास्तव भारताने आम्हाला औषध दिले नाही, तर मला वाटत नाही की ते एक मैत्रीपूर्ण पाऊल असेल. जर औषध आले नाही, तर मी तुम्हाला सांगू शकतो की मी बदला घेईन.

हायड्रॉक्सीक्लोरोक्विन हे मलेरियावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे औषध आहे. कोविडच्या सुरुवातीच्या काळात ते कोरोनावर उपचार करण्यासाठी वापरले जात होते.

# 'शिवसेनेचा बाप मीच' म्हणणाऱ्या आमदाराकडून दिलगिरी व्यक्त



**भंडारा :** भंडाऱ्यातील भाजप कार्यकर्ता मेळाव्यात भाजप नेते परिणय फुके यांनी शिवसेनेचा बाप मीच असे शिवसेनेबाबत बोलताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. दरम्यान फुके यांच्या या वक्तव्यानंतर शिवसेना शिंदे गटाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. फुके यांनी माफी मागावी अन्यथा, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ असा इशारा या पत्रकार परिषदेमधून शिवसेनेनं फुके यांना दिला गेला होता. आता राज्यभर आरोप प्रत्यारोपांच्या चौफेर फैरी झाल्यानंतर भाजप नेते परिणय फुके यांनी आपल्या वक्तव्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

दिलगिरी व्यक्त करताना फुके म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या भंडारा येथील मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधित करताना मी केलेल्या एका विधानामुळे महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा गैरसमज झाला आहे. वास्तविक मला तसे बोलायचे नव्हते. कुणाला दुखविण्याचा माझा हेतू सुद्धा नव्हता. माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला आहे. परंतु, माझ्या विधानामुळे आमच्या मित्र पक्षातील शिवसेनेचे पदाधिकारी- कार्यकर्त्यांच्या भावना दुखवल्या असतील तर त्याबद्दल मी मनापासून सर्वांची दिलगिरी व्यक्त करतो.

माझ्यावर अनेकांनी खापर फोडले. मी काही कोणाच्या आरोपाला उत्तर देत नाहीत. पण त्या दिवशी मला हे माहीत झाले की, कसे असते तुमच्या घरी जर पोराला चांगले मार्क मिळाले, तर कोणाचे कौतुक होते पोरगा किंवा आई. काही चांगले झाले तर कोणी केले आईने केले आणि जर काही खराब झाले तर कोणी केले, बापाने केले. त्या दिवशी मला हे पक्क माहित झाले की शिवसेनेचाही बाप मीच आहे.

भाजप पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात भाजप आमदार परिणय फुके यांनी शिवसेना पक्षाबाबत वादग्रस्त विधान केले होते. यावरून शिवसेना शिंदे गटाचे लोकसभा प्रमुख संजय कुंभलकर यांनी पत्रकार परिषद घेत फुके यांनी 12 तासांच्या आत त्यांच्या विधानाबद्दल माफी मागावी अन्यथा आम्ही शिवसेना शैलीत त्यांना योग्य उत्तर देऊ,असा इशारा दिला होता. यावेळी ते म्हणाले होते की, शिवसेना पक्षप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे हेच शिवसेनेचे बाप आहेत.अशा परिस्थितीत कोणीही जबरदस्तीने शिवसेनेचे अवैध बाप बनण्याचा प्रयत्न करू नये. नुकत्याच झालेल्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत फुके यांनी शिवसेनेचे उमेदवार डॉ.प्रकाश मालगावे यांना पराभूत करण्यासाठी काँग्रेस उमेदवाराला सहा मते देण्याचे षड्यंत्र रचले. त्यामुळे मालगावे यांना पराभवाला सामोरे जावे लागले.फुके यांनी शिवसेनेबद्दल अपमानास्पद भाषा वापरून कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा नेत्याला आवरावे,अन्यथा शिवसेनेचा बाप कोण आहे हे आम्ही सांगू, असा इशारा त्यांनी दिला होता.

# आरती साठे मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश:आधी होत्या भाजपच्या प्रवक्त्या, हा लोकशाहीवर सर्वात मोठा आघात- रोहित पवार



**मुंबई :** सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणे म्हणजे लोकशाहीवर केलेला सर्वात मोठा आघात असल्याची टीका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. दोन वर्षांपूर्वी भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. यावरून रोहित पवारांनी हल्लाबोल केला आहे.

आमदार रोहित पवारांनी ट्विट करत म्हटले की, याचा भारतीय न्याय व्यवस्थेच्या नि:पक्षपणावर दूरगामी परिणाम होईल. केवळ न्यायाधीश होण्याची पात्रता आहे म्हणून थेट राजकीय व्यक्तींना न्यायाधीश म्हणून नेमणे म्हणजे न्यायपालिकेला राजकीय आखाडा बनवण्याचा प्रकार नाही का? असा सवाल पवारांनी उपस्थित केला.

पुढे रोहित पवार म्हणतात, सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये तसेच चेक अँड बॅलन्स राहावा यासाठी संविधानात सेपरेशन ऑफ पॉवरचे तत्व अवलंबले आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सेपरेशन ऑफ पॉवरच्या तत्त्वाला आणि पर्यायाने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का?

जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का? असा प्रश्न रोहित पवारांनी उपस्थित केला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ६ ऑगस्ट २०२५


## आनंदराज आंबेडकर यांची फतियाबाद येथे भेट



**दौलतबाद (जावेद अहमद)** : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर छत्रपती संभाजी नगर दौऱ्यावर असताना परत मुंबईकडे जाताना रिपब्लिकन सेना जिल्हा महासचिव मा बबन साठे यांच्या तब्येतीविषयी विचारपूस करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी धावती भेट दिली, याप्रसंगी, शहराध्यक्ष अजय बनसोडे, जिल्हा प्रवक्ता सुनीलजी पांडे सर, कुंदन मोरे तालुका सचिव पश्चिम माजी सरपंच जनार्दन गवळी, माजी सरपंच भारत भास्कर, मुरलीधर साठे ,दिलीप साठे ,नारायण ठाकूर, सुनील साठे, बाळू गायकवाड, विजय बनसोडे, आनंद साठे ,संदीप शिरसाठ ,रामचंद्र बनकर, मधुकर सातपुते ,रंजना साठे, शोभाताई भालेराव, शोभाबाई बनकर, संध्या गायकवाड, गयाबाई बनसोडे, साबेरा आपा, आदीसह कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## आय.ए.एस. तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली



**मुंबई** : महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी म्हणून ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली झाली आहे. त्यांची असंघटित कामगार आयुक्त पदावरून दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तुकाराम मुंढे यांच्यासह इतर चार अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली आहे. त्यांच्या या बदलीमुळे पुन्हा एकदा प्रशासकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

१.तुकाराम मुंढे (आयएएस: आरआर: २००५) विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई यांना सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

२.नितीन काशीनाथ पाटील (आयएएस: एससीएस: २००७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

३.अभय महाजन (आयएएस: नॉन-एससीएस: २००७) विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई यांना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

४.ओंकार पवार (आयएएस: आरआर: २०२२) सहाय्यक जिल्हाधिकारी, इगतपुरी उपविभाग, नाशिक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

५.आशा अफजल खान पठाण - सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांना महासंचालक, वनमती, नागपूर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यांना सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूरचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

## अॅड.भाग्यश्री ढाकणे यांची कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट



**शिरूर कासार (प्रतिनिधी)** : दि.०४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी भाजपा भटक्या जाती व विमुक्त जाती-जमातीच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा अॅड.भाग्यश्री ढाकणे (चेमटे) व अॅड.जगदीश ढाकणे यांनी, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयास सदिच्छा भेट दिली.असता अॅड.भाग्यश्री ढाकणे यांचा वाढदिवस असल्यामुळे विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी शाॅल,श्रीफळ व बुके देऊन जन्मदिनाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या व अभिष्टचिंतन केले. तसेच अॅड.जगदीश ढाकणे यांचे ही स्वागत करण्यात आले.त्यानंतर अॅड.भाग्यश्रीने मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, 'मी ! कालिकादेवी विद्यालयाची विद्यार्थीनी आहे. माझ्या जडणघडणीला येथूनच प्रारंभ झाला. म्हणून मला माझ्या शाळेचा सार्थ अभिमान आहे.आज कालिकादेवी विद्यालयाचा उतरोत्तर लौकीक वाढत चालला आहे. हे परिवर्तन पाहून मला खूप आनंद झाला. अलिकडे तर 'कालिकादेवी गुणवत्ता पॅटर्न,स्क्रिनिंग टेस्ट,गुणवंतांचा सन्मान,सांस्कृतिक उपक्रमांची कार्यशाळा,विद्यार्थ्यांसी मुक्त संवाद,आणि कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वांचा ड्रेसकोड',पाहून ही एक नवी नांदीच वाटली" अशी भावना यावेळी व्यक्त केली.त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेबांनी शुभेच्छा देतांना सांगितले की, "अॅड.भाग्यश्री यांनी महिला प्रदेश उपाध्यक्षा पदाच्या माध्यमातून गोरगरीब, कष्टकरी, उपेक्षित,वंचित, भटके जाती-जमातीसाठी हाती घेतलेले कार्य उल्लेखनीय आहे." असे सांगून त्यांचे मनस्वी कौतुक केले.तर प्रा.डाॅ.आत्माराम झिंजुर्डे यांनी अॅड.भाग्यश्री ढाकणे यांनी आतापर्यंत केलेल्या सामाजिक,शैक्षणिक व राजकीय कार्याचा आलेख सांगितला. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,मा.जयदत्त (अण्णा) साहेबांचे स्वीय सहाय्यक मा.परमेश्वर धारकर प्रा.महारूद्र डोंगरे,प्रा.नामदेव तरकसे प्रा. संजय काकडे, प्रा.अनिल जरे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.महादेव हांगे,प्रा.बिभिषण घायाळ, प्रा. विश्वास ढाकणे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.नारायण तांबे, डॉ. अशोक घोडके, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.शशिकांत जावळे, प्रा.सुनिल मोरे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.सविता दराडे इत्यादी प्राध्यापक,शिक्षकांची विशेष उपस्थिती होती.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ६ ऑगस्ट २०२५

# कष्टकरी बाप

कष्टकरी बाप दिस अन् रात
राबतो रानात घरासाठी

बापासंगे माय उन्हात सावली
घराची माऊली सोबतीस

बाप कर्मयोगी जसा पांडुरंग
कामातच दंग सदा असे

बाप माझा देव जीवनी आधार
त्याचे उपकार थोर असे

शिक्षणाचे मोल आहे खूप खास
म्हणूनी आम्हास शिकविले

त्याच्या जीवनात जरी वाळवंट
हिरवळ भेट आम्हा दिली

मुलांसाठी पिता कल्पवृक्ष झाला
रुक्ष जीवनाला अर्थ आला

म्हणूनी जीवनी सुख शांती आली
सारे दु:ख गेली निघोनिया

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो. 94033 84889**

# डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालयात सात दिवसीय कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इं भा. पा. महिला महाविद्यालय, छ. संभाजीनगर येथील बीसीए विभाग यांच्यातर्फे महिंद्रा प्राइड क्लासरूम आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८/०७/२०२५ ते ०४/०८/२०२५ या कालावधीत “Employability Skill Training Program” या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेचे उद्घाटन प्र. प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी IQAC कोऑर्डिनेटर डॉ. पराग चौधरी यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेचे मार्गदर्शक श्रीमती हिमानी सावंत व श्रीमती मधुमिता पलानी या होत्या.या सात दिवसीय कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये नोकरीसाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करणे हे होते. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य, गटचर्चा, मुलाखतीची तयारी, बायोडेटा इत्यादी विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सादरीकरण (Presentation), गटचर्चा, प्रश्नमंजुषा, मॉक इंटरव्ह्यू अशा विविध उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यशाळेच्या अखेरीस विद्यार्थिनींनी त्यांचे अनुभव व्यक्त केले व या प्रशिक्षणातून त्यांनी काय शिकलो याचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी दिनांक 4 /8/25 रोजी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सकारात्मक प्रतिसादावरून कार्यशाळा अत्यंत यशस्वी ठरल्याचे दिसून आले. या कार्यशाळेच्या आयोजनात प्रा. अंजली उमाळकर (BCA विभाग प्रमुख), प्रा . तेजा दीक्षित व प्रा. माधुरी मुत्याल व प्रा. रितू ठाकूर विशेष सहकार्य लाभले.

# देशभक्तीपर नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा दाखवली




**नाशिक (प्रतिनिधी):**शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे मंगळवारी सकाळी आयोजित नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा आणि नृत्य कौशल्ये दाखवली. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि आत्म-अभिव्यक्ती प्रदर्शित करण्याची संधी प्रदान करणे हा होता.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्ती भावनेने ओतप्रोत रंगारंग नृत्य सादर केले. सर्जनशील शिक्षण उपक्रमा अंतर्गत शिवाजी सदन, टागोर सदन, अशोक सदन, रमण सदन या चार सदनात विभागलेल्या विद्यार्थ्यांची ही आंतर सदन स्पर्धा घेण्यात आली. सुदर्शन गुप्ता, आरीफ बेग आणि आविष्कार धिवंदे यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन केले.मुख्याध्यापक अविनाश पवार म्हणाले की, या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना त्यांची प्रतिभा विकसित करण्याची आणि आत्मविश्वास वाढवण्याची संधी मिळाली. शाळेतील सर्व शिक्षकांनी या कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले असल्याचे ते म्हणाले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्य गजराज मीणा म्हणाले की, नृत्य स्पर्धेसारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि त्यांना त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्याची संधी देतात. अशा स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी एक मौल्यवान अनुभव असतो आणि ही स्पर्धा त्यांच्या प्रतिभेचा विकास करण्यास त्यांना प्रेरित करेल.सागर काठोळे, स्वाती सोनुले, वैशाली हुड्डा, अंजली सक्सेना, अनुश्री, पूनम, प्रवीण आराख, समाधान पाटील इत्यादी शिक्षकांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी योगदान दिले.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ६ ऑगस्ट २०२५

# निसर्ग चित्र रेखाटत शेती-भातीत रमणारा कवी - प्रा. शिवाजी वाठोरे



रंग गोरापान, उंचिपुरी देहयष्टी, नाकी डोळी नीटस, डोईवर किंचितसे टक्कल, अंगात कॉलर असलेला लांब कुर्ता - पायजमा, शब्दांत, आवाजात ग्रामीण, गावरान बाज असा कविमनाचा माणूस ज्याचे नाव ना. धों. महानोर, म्हणजे नामदेव धोंडिबा महानोर. पळसखेड (ता.सोयगाव, जि. औरंगाबाद) या छोट्या गावात जन्मलेली ही व्यक्ती पुढे सबंध महाराष्ट्रात नाव कमावेल, विधान परिषदेपर्यंत मजल मारेल याची कोणी कल्पनाही केली नसेल. एका कार्यक्रमात तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांची कविता ऐकली. त्यांना ती भावली आणि मुंबईला भेटायला बोलावले. मग ना. धों. यांच्या कार्याचा आलेख वाढतच गेला. एका कार्यक्रमात लता मंगेशकर यांनी त्यांची कविता ऐकली आणि त्याही ना. धों. यांच्या कवितेच्या प्रेमातच पडल्या. लता ताईंनी पुढे त्यांची बारा - चौदा गाणी गायली. 'जैत रे जैत ' सह अनेक चित्रपटात ना.धों. यांनी लिहिलेली आणि लता मंगेशकर यांनी गायलेली गाणी आहेत, जी सामान्य जणांच्या ओठावर असतात. आपली शेती - भाती आणि आपल्या कविता हेच ना. धों. यांचे जग म्हणता येईल. त्यांनी पळसखेड येथे आधुनिक शेतीचे अनेक प्रयोग केले, काही फसलेही. आधुनिक फळबागेतून उत्पन्न काढले. काव्य - कथा प्रांतातही त्यांचा लीलया वावर आहे. पळसखेड येथील शेतात अनेकदा मैफिली रंगल्यात. अनेक दिग्गज कवी, साहित्यिक मंडळी त्यांच्या फार्म हाऊसला भेटी देत असतात. अभ्यंगतांचे ते तोंड भरून स्वागत करीत असतात. त्यांचे गावाकडच्या गोष्टी, वही , आदी पुस्तके बहुचर्चित ठरली. त्यांच्या लेखनात लोकगीते, लोककथा डोकावतात, असे काहीजण म्हणतात तर त्यांचेवर लोक कथातून कथाबिज उचलल्याचे काही जण आरोप करायचे. मात्र, त्याची किंचितही तमा न बाळगता त्यांनी आपल्या ग्रामीण अनुभूतीस शब्दबद्ध करण्याचा मार्ग स्वीकारला. आयुष्यभर साहित्य सेवा आणि आधुनिक शेती यातच मन रमविले. त्यांची प्रयोगशील शेती बघायला अनेक जण मुद्दामहून जात असत. आम्हीही एकदा गेलो. शेतातल्या प्रत्येक झाडावर कवितेच्या चार ओळी लिहिलेले फलक बघून आम्ही तर विस्मयचकित झालो होतो. काही दिवसांपूर्वी गावातीलच काहींनी व्यक्ती द्वेषातून त्यांना मानसिक त्रास देण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. पण तेही फारसे मनावर न घेता त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. मध्यंतरी त्यांच्या निवासस्थानी लता मंगेशकर दोन - तीन दिवस वास्तव्यास होत्या, तेव्हा कृषिभूषण कुमारराव अन्वीकर यांचेसह निवडक मित्रांची त्यांच्या शेतात चांगलीच मैफिल रंगली होती. सिल्लोड (जि. औरंगाबाद) येथे आम्ही कै. दादासाहेब अन्वीकर स्मारक ग्रंथालय चालवतो. या ग्रंथालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आम्ही पाटील मंगल कार्यालयात ग्रंथालय संघाचे जिल्हास्तरीय अधिवेशन भरविले. मोठा कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमास त्यांनी उपस्थित राहून ग्रंथालयास काही पुस्तके दान केली. कार्यक्रम संपल्यानंतर मी महाराष्ट्र राज्य शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाचा पुरस्कार प्राप्त 'स्वप्न पहाट' हा माझा कवितासंग्रह त्यांना भेट दिला. त्या वेळी कवितेवर ते भरभरून बोलत होते. वडिलकीच्या नात्याने 'लिहीत रहा.' असा सल्लाही त्यांनी दिला. कृतार्थ वाटलं मला. अलिकडेच त्यांच्या सुविद्य पत्नी निवर्तल्या. तेव्हापासून त्यांनी नवीन काही लिहिल्याचे वाचनात नाही. मुळातच संवेदनशील वृत्तीचे हे व्यक्तित्व आता वार्धक्याकडे झुकले आहे. आता ते पहिल्यासारखे फारसे फिरत नाहीत. कवी मनाचा हा रांगडा गडी अजूनही शेतात रमतो. शेतीवर जिवापाड प्रेम करतो आणि शेतीशी संबंधित भावनेतून त्यांचा लेखन प्रवास आहे. पळसखेडची गाणी, रानातल्या कविता, अजिंठा, गंगा वाहू दे निर्मळ, गपसप, गावातल्या गोष्टी, पानझड, वही, पक्ष्यांचे लक्ष थवे, पु. ल. देशपांडे आणि मी, यशवंतराव चव्हाण आणि मी, शरद पवार आणि मी, कापूस खोडवा, जगाला प्रेम अर्पावे अशा अनेक पुस्तकांची सृजनात्मक निर्मिती त्यांचे हातून घडली. विदूषक, जैत रे जैत, अबोली, सर्जा, मालक, आदी सकस चित्रपट कलाकृती त्यांच्या काव्यशृंगाराने सुशोभित झालेल्या असल्याचे दिसून येते. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे, ज्यामध्ये भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार, डॉ . पंजाबराव देशमुख जनस्थान पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, अनंत भालेराव स्मृती पुरस्कार, गीतकार जीवन पुरस्कार, मराठवाडा भूषण पुरस्कार, कृषिभूषण वनश्री कृषिरत्न पुरस्कार आदी अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाणारे सुमारे डझनभर पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत.राज्याच्या विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली होती. असा हा रांगड्या स्वभावाचा संवेदनशील कवी हरवला. द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त त्यांना अभिवादन! (लेखक प्रख्यात कवी, समीक्षक आहेत.)

## लाडकी बहीण योजनेचा फटका : यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही





**मुंबई** : लाडकी बहीण योजनेचा आनंदाचा शिधा योजनेला फटका. यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नसल्याची माहिती राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही, असे भुजबळ यांनी स्पष्टच सांगितले आहे.

आनंदाचा शिधा या योजनेतून राज्यातील गरिबांना सणासुदीच्या काळात केवळ १०० रुपयांमध्ये चार वस्तू योजनेच्या माध्यमातून मिळत होत्या. परंतु, आता लाडकी बहीण योजनेमुळे गोरगरिबांना सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील तिजोरीतील एकदम ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा थोडा होत असल्याची कबुली छगन भुजबळ यांनी दिली आहे. आम्ही आता राज्य सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सध्या योजनांचा निधी बाबत मागेपुढे होत असले तरी आम्ही निधी उपलब्ध होईल तशी योजना चालवत राहू, असे भुजबळ म्हणाले.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, आनंदाचा शिधा द्यायचा असेल तर त्यासाठी दोन ते तीन महिने आधी टेंडर काढावे लागते. आता तरी हे शक्यत नाही. आनंदाचा शिधा आत्ता मिळणार नाही. त्यासाठी टेंडर काढावे लागते, त्यासाठी दोन तीन महिन्यांचा कालावधी लागतो. वर्षाला शिवभोजन थाळी साठी १४० कोटी रुपये तर आनंदचा शिधा साठी ५५० कोटी रुपये लागत होते.

आनंदाचा शिधा या योजनेतून सणासुदींच्या निमित्ताने राज्यातील रेशनकार्ड धारकांना फक्त १०० रुपयात काही जीवनावश्यक वस्तू देण्यात येत होत्या. त्यामध्ये एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चना डाळ, एक लीटर पामतेल देण्यात येत होते. आता हा शिधा यंदा देण्यात येणार नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ही योजना सुरू करण्यात आली होती. २०२२ साली दिवाळीला पहिल्यांदा आनंदाचा शिधा देण्यात आला होता.

